# पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
# पोलीस भरती - २०१८

क्र. आस्था-३(१)/पो.भ.-२०१८/लेखी परिक्षा-सुधारीत उत्तरतालिका व गुण /२०१८,पुणे,दि. २१/४/२०१८

## लेखी परीक्षेस बसलेल्या उमेदवारांचे गुण प्रसिध्दी बाबत

पोलीस भरती -२०१८ मध्ये लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या व प्रत्यक्ष परीक्षेस बसलेल्या उमेदवारांना सुचित करण्यांत येते की, दिनांक १७/०४/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या लेखी परीक्षेची उत्तरतालिका (**Answer key**) बाबत प्राप्त झालेल्या आक्षेपांची पडताळणी करण्यांत आलेली असून, प्राप्त झालेल्या आक्षेपांचे निरासन करण्यात आलेले आहे.

दिनांक १७/४/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली उत्तरतालिका (**Answer key**) संच **A,C,**व **D** हया बरोबर असुन सदरचे उत्तरतालिका नुसार उमेदवारांना प्राप्त झालेले गुण हे अंतिम ठरविण्यात आलेले आहेत. प्रश्नसंच **B** मधील प्रश्न क्र ६३ चे उत्तरतालिका मध्ये **C** ऐवजी **D** हा पर्याय दर्शविण्यात आलेला होता. परंतु दर्शविण्यात आलेला **D** हा पर्याय हे उत्तर चुकीचे असुन **C** पर्याय हे उत्तर बरोबर आहे. त्यानुसार **B** संचाची सुधारीत उत्तरतालीका व उमेदवारांना मिळालेल्या गुणांची सुधारीत यादी पुणे शहर पोलीस संकेतस्थळावर व शिवाजीनगर पोलीस मुख्यालय येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यांत आली आहे. सदरचे गुण हे अंतिम असुन सर्व उमेदवारांनी तशी नोंद घेण्यात यावी.

ठिकाण :- पुणे

दिनांक :- २१/०४/२०१८.

( साहेबराव पाटील)
अध्यक्ष, पोलीस भरती समिती -२०१८,
अपर पोलीस आयुक्त,प्रशासन, पुणे शहर